# अमरावती महानगरपालिका,अमरावती.

# फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन)
# आदर्श उपविधी २००९

# भाग - १

**१.१ संक्षिप्त नामाभिधान -**

**(अ)** हे उपविधी अमरावती महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २००९ या नावाने संबोधण्यात येतील.

(ब) हे उपविधी अमरावती महानगरपालिका क्षेत्रात लागु राहील.

(क) हे उपविधी राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून अंमलात येतील.

**१.२ व्याख्या -**

**(अ) विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसल्यास या नियमात -**

१) “ फेरीवाला ” म्हणजे आपला माल कोणत्याही पक्क्या संसाधनाशिवाय परंतु सार्वजनिक/खाजगी जमिनीवर एखाद्या तात्पुरत्या स्थिर संरचनेच्या आधारे किंवा फिरत्या गाडीच्याा आधारे किंवा डोक्यावर भार वाहुन फेरीने लोकांना वस्तुची विक्री करणारी किंवा सेवा देणारी व्यक्ती.
(टीप - फेरीवाल्यांचे व्याख्येमध्ये अमरावती महानगरपाालिका यांनी यापूर्वी दिलेले अपंगाकरीता पीसीओ बुथ,चर्मउद्योग,आरे-सरिता दुधकेंद्र तसेच इतर पक्के स्टॉल यांचा समावेश नाही.)

२) “ स्थिर फेरीवाला ” म्हणजे एकतर नेमून दिलेल्या सार्वजनिक/खाजगी क्षेत्रातील एका जागेवर बसून मालाची विक्री करणारी किंवा सेवा देणारी व्यक्ती.

३) “ फिरता फेरीवाला ” म्हणजे ढकल गाडीवरुन किंवा हातगाडीवरुन किंवा सायकलवरुन किंवा वाहनातून किंवा आपल्या डोक्यावरील टोपलीतून मालाची विक्री करत एका ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी जाणारी व्यक्ती.

४) “ व्यक्ती ” म्हणजे वय १८ वर्षे पूर्ण झालेली व्यक्ती.

५) “ कुटुंब ” म्हणजे पती-पत्नी व त्यांची १८ वर्षापेक्षा कमी वय असलेली मुले.

६) “ फेरीवाला क्षेत्र - I ” म्हणजे अमरावती महानगरपालिकेकडून फिरता फेरीवाला व स्थिर फेरीवाला यांना व्यवसायासाठी दिर्घकाळासाठी किंवा तात्पुरते अनुज्ञेय म्हणून घोषित करण्यात आलेले क्षेत्र.

७) “ फेरीवाला क्षेत्र - II ” म्हणजे अमरावती महानगरपालिकेने घोषित केलेले असे क्षेत्र की,ज्या क्षेत्रामध्ये फक्त फिरता फेरीवाला व्यवसाय करु शकतील. या क्षेत्रामध्ये ना-फेरीवाला क्षेत्र व फेरीवाला क्षेत्र - I व्यतीरीक्त क्षेत्राचा समावेश असेल.

८) “ ना - फेरीवाला क्षेत्र ” म्हणजे अमरावती महानगरपालिकेने त्यांच्या हद्दीत फेरीवाला व्यवसाय करण्या करीता प्रतिबंधित म्हणून जाहिर केलेले क्षेत्र.

९) “ अधिकृत फेरीवाला ” म्हणजे ज्याने अमरावती महानगरपालिकेकडे फेरीवाला म्हणून नोंदणी केलेली आहे.आणि महानगरपालिकेच्या हद्दीत घोषित फेरीवाला क्षेत्रात किंवा खाजगी ठिकाणी संबंधित मालमत्ताधारकाच्या मान्यतेने स्वतः व्यवसाय करीत आहे,अशी व्यक्ती.

१०) “ अनधिकृत फेरीवाला ” म्हणजे अधिकृत फेरीवाल्या व्यतीरीक्त इतर फेरीवाले.

११) “ किऑस्क ” म्हणजे असा सुशोभित केलेला खोका की ज्यामध्ये मध्यभागी बसून व्यवसाय करता येतो.

१२) “ निराधार महिला ” म्हणजे जिला उपजिविकेसाठी कोणतेही साधन उपलब्ध नाही आणि जिच्या कुटुंबात कमवती व्यक्ती नाही अशी स्त्री.

१३) “ मागासवर्गिय ” म्हणजे ज्या व्यक्तीला अनुसुचित जाती/जमाती/इतर मागासवर्ग/ भटक्या जाती/विमुक्त भटक्या जमाती/विशेष मागासवर्ग यांचे शासनाचे सक्षम प्राधिका -याने जातीचे वैध प्रमाणपत्र दिले आहे अशी व्यक्ती.

१४) “ अपंग ” म्हणजे ज्या व्यक्तीकडे ४० टक्क्याहून अधिक अपंगत्व असल्या बाबत जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र आहे अशी व्यक्ती.

१५) “ प्रकल्पग्रस्त ” म्हणजे ज्या व्यक्तीला शासनाचे सक्षम प्राधिका-याने प्रकल्पग्रस्त असल्या बाबत प्रमाणपत्र दिले आहे अशी व्यक्ती.

**(ब)** या नियमात वापरण्यात आलेल्या ज्या शब्दांचा किंवा वाक्यसमुहाचा स्वतंत्र व्याख्या देण्यात आलेल्या नाहीत,ते महानगरपालिका अधिनियमात ज्या अर्थाने वापरण्यात आले असतील तोच त्यांचा अर्थ गृहीत धरण्यात येईल.

# भाग - २

## फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियमनासाठी संस्थात्मक रचना

## २. अमरावती महानगरपालिका शहर फेरीवाला समिती.

## २.१ अमरावती महानगरपालिका शहर फेरीवाला समिती स्थापन करणे -

महानगरपालिका खालीलप्रमाणे शहर फेरीवाला समिती स्थापन करील :-

| | | |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष | : महापौर |
| २. | सदस्य | : उपमहापौर |
| ३. | सदस्य | : स्थायी समित सभापती |
| ४. | सदस्य | : सभागृह नेता |
| ५. | सदस्य | : विरोधी पक्ष नेता |
| ६. | सदस्य | : आयुक्त |
| ७. | सदस्य | : पोलीस उप-आयुक्त (वाहतुक) |
| ८. | सदस्य | : आयुक्त यांनी नामनिर्देशीत केलेला अधिकारी |
| ९. | सदस्य | : सार्वजनिक जमिनीची मालकी असणारे प्राधिकरणाचे प्रतिनिधी |
| १०. | सदस्य | : संघटना (बाजार,व्यापारी,राहिवासी,इ.)चे ३ प्रतिनिधी (पैकी १ महिला) |
| ११. | सदस्य | : ४ फेरीवाला संघटनेचे प्रतिनिधी |
| १२. | सदस्य | : लिड बँकेचे व्यवस्थापक |
| १३. | सदस्य | : कमाल ४ सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी (पैकी किमान २ महिला) |
| १४. | सदस्य सचिव | : उपआयुक्त (फेरीवाला/अतिक्रमण) |

शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान २० टक्के एवढे फेरीवाल्यांचे प्रतिनिधी व १० टक्के सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी असतील व सदर प्रतिनिधींचे नामनिर्देशन आयुक्त करतील. तसेच समितीच्या एकूण सदस्यांपैकी एक तृतीयांश महिला प्रतिनिधी शक्यतो असाव्यात. समितीच्या सभेसाठी एकूण सदस्यांपैकी किमान एक तृतीयांश सभासदांची उपस्थिती आवश्यक राहील. समितीची बैठक तिन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी. परंतु,आवश्यक्तेनुसार तातडीची बैठक अध्यक्षांना बोलविता येईल.

## २.२ अमरावती महानगरपालिका शहर फेरीवाला समितीची कर्तव्ये व जबाबदा-या -

अमरावती महानगरपालिका शहर फेरीवाला समितीच्या कर्तव्य व जबाबदा-यांमध्ये खालील बाबींचा समावेश असेल :-

१) फेरीवाल्यांकरीता शहरात जागांचे नियोजन करणे तसेच स्थिर फेरीवाल्यांकरीता फेरीवाला निहाय वाटप करावयाच्या जागेचे क्षेत्रफळ व स्वरुप ठरविणे.
२) स्थिर व फिरता फेरीवाल्यांच्या नोंदणी संख्येची शिफारस महानगरपालिकेला करणे.
३) महानगरपालिकेच्या मान्यतेने फेरीवाल्यांकरीता नोंदणी शुल्क व इतर शुल्क निश्चीत करणे.
४) कमाल ५ वर्षे या मर्यादेच्या अधिन राहुन फेरीवाल्यांकरीता नोंदणीचा कालावधी ठरविणे.
५) फिरते फेरीवाले व स्थिर फेरीवाले यांनी विक्री करावयाचे मालाचा प्रकार ठरविणे.
६) फेरवाला क्षेत्र - I व फेरीवाला क्षेत्र - II व ना फेरीवाला क्षेत्राची शिफारस महानगरपालिकेला करणे.
७) फिरते फेरीवाल्यांकरीता माल वाहतुकीच्या वाहनाचा आकार,प्रकार,रचना ठरविणे.
८) फेरीवाला क्षेत्रामध्ये पुरविण्यात येणा-या सोयी/सुविधांबाबत धोरण ठरविणे.
९) फेरीवाल्यांकरीता सामाजिक सुरक्षितते बाबत व कल्याणकारी धोरण ठरविणे.
१०) आठवडी बाजाराबाबत धोरण ठरविणे.
११) अटी व शर्तीचे भंग करणा-या फेरीवाल्यांकडून आकारण्यात येणा-या दंडाचे धोरण ठरविणे.
१२) फेरीवाल्यांचे विनियमन करणा-या इतर मुद्दयांबाबत धोरण ठरविणे.
१३) फेरीवाला विक्रेत्यांसाठी नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करणे,त्याचे नविनीकरण करणे, निलंबन करणे अथवा रद्द करणे याबाबतचे प्रारुप व पध्दती तसेच त्यांना ओळखपत्र जारी करणे.
१४) नोंदणीपत्राचे प्रदान व नविनीकरण या करीता शुल्क आकारणे व वसुली आणि नोंदणीच्या अटी व शर्तीचे अथवा या अधिनियमातील इतर तरतुदींचे उल्लंघना बाबत दंड बसविणे व ते वसुल करणे याची पध्दती.
१५) फेरीवाला विक्रेत्यांच्या नोंदणी विषयक स्थानिक प्राधिकरणाकडे दाखल करावयाच्या अपिलाचे प्रारुप व पध्दती तसेच अपिले निकाली काढण्याबाबतची प्रक्रिया.
१६) नोंदणीकृत पथविक्रेत्यांना गाळ्यांचे आवंटन करण्याची पध्दती व याविषयीच्या अटी आणि शर्ती.
१७) अनुज्ञप्तीचे प्रदान,नविनीकरण,निलंबन व रद्द करणे या बाबत प्रपत्र व पध्दती.
१८) अनुज्ञप्तीचे प्रदान व नविनीकरण या करीता शुल्क आकारणी व वसुली तसेच अनुज्ञप्तीच्या अटी व शर्तीचे उल्लंघना बाबत दंड बसविणे व ते वसुल करणे याची पध्दती.
१९) मास्टर प्लान,विकास योजना,परिक्षेत्र योजना,अभिन्यास आराखडा अथवा इतर कोणत्याही जागेविषयक योजनेत फेरीवाला विक्रेत्यांसाठी विक्रय परिक्षेत्र वेगळे ठरवुन देण्यासाठी नियोजन प्राधिकरणाने अंगिकारावयाची प्रमाणभुत तत्वे.
२०) निर्बंधमुक्त परिक्षेत्र,निर्बंधित विक्रय परिक्षेत्र व विक्रय निषीध्द परिक्षेत्र निश्चीत करण्यासाठी तत्वे.
२१) ज्या अटींवर खाजगी जागांना निर्बंधमुक्त परिक्षेत्र,निर्बंधित विक्रय परिक्षेत्र व विक्रय निषीध्द परिक्षेत्र निर्दिष्ट करता येईल अशा अटी ठरविणे.
२२) विक्रय परिक्षेत्रांची धारण क्षमता निश्चीत करण्यासाठी तत्वे ठरविणे आणि फेरीवाला विक्रेत्यांना विक्रय परिक्षेत्रांच्या धारण क्षमतेमध्ये सामावुन घेण्याचे उद्देशाने तज्ञांचे मदतीने फेरीवाला विक्रेत्यांचे सध्याचे संख्येची डिजीटल फोटोयुक्त सर्वसमावेशक गणना करण्याची पध्दती ठरविणे.
२३) सार्वजनिक स्वास्थ व स्वच्छतेची काळजी घेण्याच्या तत्वांसह पथ विक्रयाच्या अटी व शर्ती निश्चीत करणे.
२४) फेरीवाला विक्रयाशी संबंधित सर्व बाबींचा समन्वय राज्य स्तरांवर साधण्या करीता राज्य नोडल अधिकारी नियुक्त करणे.

२५) शहर विक्रय समिती,स्थानिक प्राधिकरण,नियोजन प्राधिकरण व राज्य नोडल अधिकारी यांनी फेरीवाला विक्रेत्यां बाबत सुयोग्य अभिलेख व इतर दस्तऐवज बाळगावयाची पध्दती ठरविणे.

२६) फेरीवाला विक्रेत्यांना नोटीस देणे,त्यांचे निष्कासन करणे,त्यांचे गाळे,माल व सामान अवरुध्द,नष्ट अथवा जप्त करणे आणि निष्कासित केलेल्या पथविक्रेत्यांचे पुर्नस्थापन करणे व त्यांना प्रदेय नुकसान भरपाई या बाबत पध्दती ठरविणे.

२७) समुचित सरकारास योजनेमध्ये समाविष्ट करण्यासाठी उचित वाटेल असे इतर कोणतेही विवरण.

२८) समुचित सरकारने पोट कलम १ अंतर्गत अधिसुचित केलेल्या योजनेचा गोषवारा स्थानिक प्राधिकरणाद्वारे किमान दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये विहीत पध्दतीने प्रकाशित करण्यात येईल.

२९) अर्जातील त्रुटी दुर करण्याची संधी दिल्याखेरीज व त्याची बाजु ऐकुन घेतल्या खेरीज शहर विक्रय समिती कोणताही अर्ज संक्षिप्तपणे नाकारणार नाही.

३०) प्राप्त अर्ज हा या अधिनियमातील व या अंतर्गत तयार केलेल्या नियम व योजनेतील तरतुदी यांना अनुसरुन असल्याचे शहर विक्रय समितीचे किंवा शहर विक्रय समितीने अधिकृत केलेल्या अधिका-यांचे समाधान झालेले असल्यास तो त्या फेरीवाला विक्रेत्यांच्या नावाची नोंदणी करील.

३१) शहर विकास समितीची सभा स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात विहीत केलेल्या वेळेत व जागी घेण्यात येईल व सभेतील कार्यवाही बाबत विहीत केलेल्या नियमांचे पालन करण्यात येईल.

३२) या अधिनियमातील तरतुदींचे परिपालन करण्यासाठी शहर विक्रय समिती,विहीत केलेल्या पध्दतीने व उद्दिष्टां करीता जिचे सहाय्य अथवा सल्ला तिला आवश्यक वाटेल अशा व्यक्तीला स्वत:सोबत संलग्न करुन घेईल.

३३) पोट कलम १ अंतर्गत अशा प्रकारे कोणत्याही उद्दिष्टां करीता संलग्न करुन घेतलेल्या व्यक्तीला त्या उद्दिष्टांशी संबंधित चर्चेत भाग घेण्याचा हक्क राहील. परंतु समितीच्या सभेत मतदान करण्याचा हक्क राहणार नाही व ती व्यक्ती कोणत्याही कारणासाठी समितीची सदस्य मानली जाणार नाही.

३४) पोट कलम १ अंतर्गत अशा प्रकारे संलग्न करुन घेण्यात आलेल्या व्यक्तीला विहीत केल्यानुसार भत्ते प्रदेय राहतील.

## अमरावती महानगरपालिका शहर फेरीवाला समितीचे कार्य

१) फेरीवाला विक्रेत्यांना विहीत प्रपत्रात व पध्दतीने आणि विहीत अटी व शर्तीच्या आधारे नोंदणी प्रमाणपत्रे प्रदान करणे,नविनीकरण करणे,निलंबन करणे अथवा रद्द करणे.

२) फेरीवाला विक्रेत्यांना विहीत प्रपत्रात व पध्दतीने ओळखपत्र जारी करणे.

३) फेरीवाला विक्रेत्यांपासुन विहीत रकमेचे शुल्क नोंदणीसाठी अथवा नोंदणीच्या नविनी करणासाठी वसुल करणे.

४) नोंदणी शुल्क,नागरी सुविधांचा उपयोग घेणा-या फिरत्या स्टॉलद्वारे वाहनतळाचा उपयोग करण्याबाबत शुल्क बँक,स्थानिक प्राधिकरणांचे काउंटर्स अथवा शहर विक्रय समितीचे काउंटर्स यांचे मार्फत वसुल करण्याची पध्दती स्थानिक प्राधिकरणाच्या सल्ल्याने निश्चीत करणे.

५) विक्रय परिक्षेत्रांची ओळख व निर्धारण करणे.

६) विक्रय परिक्षेत्रांमध्ये विक्रीच्या वेळा निश्चीत करणे.

७) जागा,रस्ता,पदपथ,किनारा,प्रतिक्षाक्षेत्र,उद्याने व विक्रयासाठी निर्धारीत केलेल्या इतर सार्वजनिक जागांचे विहीत पध्दतीने अभिलेख बाळगणे.

८) विक्रय परिक्षेत्रांचे नियतकालिक सर्वेक्षण करणे.

९) फेरीवाला विक्रेत्यांच्या बाबतीत आकडेवारी गोळा करुन बाळगणे.

१०) विक्रय परिक्षेत्रांधिल विभीन्न श्रेणीच्या स्थिर व फिरत्या स्टॉल्स करीता गुणात्मक सुत्र निर्धारीत करणे.

११) प्रत्येक विक्रय परिक्षेत्राची अधिकतम धारण क्षमता तपासणे व निश्चीत करणे.

१२) निर्बंधमुक्त विक्रय परिक्षेत्र,निर्बंधीत विक्रय परिक्षेत्र व विक्रय निषीध्द परिक्षेत्र विहीत पध्दतीने निश्चीत करुन जाहिर करणे.
१३) प्रत्येक विक्रय परिक्षेत्राच्या जागी त्याचा प्रकार,परिसीमा व विक्रीच्या वेळा दर्शविणारे फलक रोवणे.
१४) आठवडी बाजार,रात्रीचे बाजार,सुटीच्या दिवसातील बाजार,उत्सवांचे बाजार यातील विक्रयाचा जागा व वेळा जाहिर करणे.
१५) पाणी,स्वच्छता,कच-याचे नियोजन,विज पुरवठा यासह नागरी सुविधा विक्रय परिक्षेत्रां मध्ये पुरेशा प्रमाणात पुरवल्या जातील याची खात्री करणे.
१६) फेरीवाला विक्रेत्यांच्या एकूण क्रियाकलापांवर देखरेख ठेवणे.
१७) जनतेला पुरविण्यात येणा-या उत्पादीत वस्तुंचा व सेवांचा दर्जा तसेच स्थानिक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट सार्वजनिक स्वास्थ,स्वच्छता व सुरक्षा विषयक मापदंडांचा दर्जा कायम राखला जाईल याची दक्षता घेणे.
१८) विनिर्दिष्ट अटी व शर्तीचे पालन करुनच आवंटीत गाळ्याचा उपयोग करण्यात येईल याची दक्षता घेणे.
१९) नोंदणी प्रमाणपत्र जारी करणे,नविनीकरण करणे,निलंबीत अथवा रद्द करणे याबाबतच्या अटी व शर्ती विहीत पध्दतीनुसार ठरविणे.
२०) नोंदणीच्या अटी व शर्तीचा भंग झाल्यास दंडाच्या आकारणीसह करावयाची कार्यवाही निश्चीत करणे.
२१) संस्थागत यंत्रणे मार्फत पत प्राप्ती बाबत जागरुकता वाढविणे.
२२) फेरीवाला विक्रेत्यांच्या क्रियाकलापांचे नियमन करण्यासाठी सुत्र निश्चीत करणे.
२३) मृत्यु,आजारपण अथवा अपंगत्व आल्यास फेरीवाला विक्रेत्यांना विमा,प्रसुतिलाभ,वृध्दा वस्था,पेंशन व तर सामाजिक सुरक्षा योजना पुरविण्या बाबत अटी व शर्ती निश्चीत करणे.
२४) फेरीवाला विक्रेत्यांच्या संघटना व स्वावलंबी गट स्थापन होण्यासाठी मार्गदर्शक तत्वे नेमुन देणे.
२५) उद्यमशिलता,तांत्रीक व व्यावसायिक क्षमता याबाबत माहिती देण्यासाठी फेरीवाला विक्रेत्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम चालविणे.
२६) फेरीवाला विक्रेत्यांचे तक्रारीचे निवारण करणे व त्यांचे आपापसातील विवाद सोडविणे.

## २.३ अमरावती महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समिती

**अमरावती महानगरपालिका प्रभाग फेररीवाला समिती स्थापन करणे : -**

अमरावती महानगरपालिका खालीलप्रमाणे प्रत्येक प्रशासकीय प्रभागासाठी प्रभाग फेरीवाला समिती स्थापन करील :-

| | | |
|---|---|---|
| १) | अध्यक्ष | : प्रभाग समिती अध्यक्ष |
| २) | सदस्य | : त्या प्रभागातील सर्व नगरसेवक |
| ३) | सदस्य | : वरिष्ठ पोलीस निरीक्षक |
| ४) | सदस्य | : पोलीस निरीक्षक (वाहतुक) |
| ५) | सदस्य | : वैद्यकीय अधिकारी |
| ६) | सदस्य | : अतिक्रमण अधिकारी |
| ७) | सदस्य | : उप-अभियंता (स्थापत्य) |
| ८) | सदस्य | : नगर रचना अधिकारी |
| ९) | सदस्य | : स्थानिक पातळीवरील |
| १०) | सदस्य सचिव | : विभाग अधिकारी/क्षेत्रीय अधिकारी |

प्रभाग फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान १० टक्के एवढे फेरीवाल्यांचे प्रतिनिधीत्व असेल. सदर प्रतिनिधींचे नामनिर्देशन आयुक्त करतील. समितीच्या एकूण सदस्यांपैकी एक तृतीयांश महिला प्रतिनिधी शक्यतो असाव्यात. समितीच्या सभेसाठी

एकूण सदस्यांपैकी एक तृतीयांश सभासदांची उपस्थिती आवश्यक राहील. समितीची बैठक तिन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी. परंतु,आवश्यक्तेनुसार तातडीची बैठक अध्यक्षांना बोलविता येईल.

**२.४ महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समितीची कर्तव्ये व जबाबदा-या -**

महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समितीच्या कर्तव्ये व जबाबदा-यांमधे खालील बाबींचा समावेश असेल :-

१) प्रभाग फेरीवाला तांत्रीक समितीने शिफारस केल्याप्रमाणे फेरीवाला क्षेत्र - I,फेरीवाला क्षेत्र - II व ना फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याकरीता शहर फेरीवाला समितीकडे शिफारस करणे.
२) प्रभाग फेरीवाला तांत्रीक समितीने शिफारस केल्याप्रमाणे फेरीवाला क्षेत्रा करीता क्षेत्रनिहाय नकाशे व पीच (बैठक) ची संख्या निश्चीत करणे.
३) प्रभाग फेरीवाला तांत्रीक समितीने शिफारस केल्या प्रमाणे फेरीवाला क्षेत्रामध्ये क्षेत्रनिहाय विक्री करावयाच्या मालाचे प्रकार निश्चीत करणे.
४) प्रभाग फेरीवाला तांत्रीक समितीने शिफारस केल्या प्रमाणे आठवडी बाजाराची जागा,दिवस व वेळ निश्चीत करणे.
५) फेरीवाला क्षेत्र तसेच ना फेरीवाला क्षेत्रामध्ये नियंत्रण ठेवणे.
६) स्थिर फेरीवाल्यां करीत जागेचे सोडत पध्दतीने वाटप करतांना सोडत करावयाची आवश्यक्ता भासल्यास किमान ३ व्यक्तींचे पंच मंडळ घोषित करणे. या पंच मंडळाचा अध्यक्ष प्रभाग अधिकारी/क्षेत्रीय अधिकारी असेल.
७) नागरीकांकडून फेरीवाल्यांचे विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारींवर शहानिशा करुन उचित कार्यवाही करणे. (दंड,नोंदणी रद्द करणे,नोंदणी निलंबीत करणे इ.)
८) प्रत्येक फेरीवाला क्षेत्रा करीता फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती स्थापन करणे.

**२.५ अमरावती महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती**

अमरावती महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीची स्थापना करणे :-

महानगरपालिका खालीलप्रमाणे प्रत्येक प्रशासकीय प्रभागासाठी प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती स्थापन करील.

| | |
|---|---|
| १. अध्यक्ष | : सहाय्यक आयुक्त/प्रभाग अधिकारी/क्षेत्रीय अधिकारी |
| २. सदस्य | : उप-अभियंता (स्थापत्य) |
| ३. सदस्य | : पोलीस निरीक्षक (वाहतुक) |
| ४. सदस्य | : नगर रचना अधिकारी |
| ५. सदस्य | : अतिक्रमण निष्कासन अधिकारी |

**२.६ महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीची कर्तव्ये व जबाबदा-या -**

महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीच्या कर्तव्ये व जबाबदा-यांमध्ये खालील बाबींचा समावेश असेल :-

१) प्रभागातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे तसेच सर्वेक्षण करतांना सर्वेक्षण नमुन्यामध्ये फेरीवाल्यांच्या मालाचा प्रकार,तो किती वर्षापासुन व्यवसाय करतो,व्यवसायाचे ठिकाण इत्यादी बाबतची माहिती भरुन घेणे व त्याबाबतचे तत्सम पुरावे घेणे.
२) फेरीवाल्यांसाठी प्रभागात जागांचा शोध घेणे. फेरीवाला क्षेत्र व ना फेरीवाला क्षेत्र घोषित करण्या करीता प्रभाग फेरीवाला समितीकडे शिफारस करणे. तसेच सक्षम प्राधिका-याने मंजुर केलेल्या फेरीवाला क्षेत्रांना क्रमांक देणे.

३) फेरीवाला क्षेत्रांकरीता क्षेत्रनिहाय नकाशे व पीच (बैठक) ची संख्या निश्चीत करुन प्रभाग फेरीवाला समितीकडे शिफारस करणे.
**४)** आठवडी बाजाराची जागा,दिवस व वेळ निश्चीत करण्या बाबत प्रभाग फेरीवाला समितीकडे शिफारस करणे.
**५)** फेरीवाला विक्रयासाठी जागेच्या नियोजनाची सुत्रे  निश्चीत करणे.
**६)** मास्टर प्लान,विकास योजना,परिक्षेत्र योजना,अभिन्यासाचा आराखडा व इतर कोणत्याही आराखड्यात विक्रय परिक्षेत्रासाठी जागा निश्चीत करणे.
**७)** शहर विक्रय समितीच्या कार्यावर नियोजन सुत्रांच्या बाबतीत निगराणी ठेवणे.
८) फेरीवाला विक्रेत्यांना सुनिश्चीत विक्रय परिक्षेत्रांमध्ये सामावुन घेण्यासाठी महानगराचा अथवा शहराचा मास्टर प्लान,विकास योजना,परिक्षेत्र योजना, अभिन्यास आराखडा अथवा इतर कोणताही आराखडा दुरुस्त करणे.
**९)** शहर अथवा महानगराच्या  विशीष्ट आवश्यक्तेनुसार विक्रय परिक्षेत्र आखुन देणे.
**१०)**संबंधित महानगरात अथवा शहरात सध्या असलेली फेरीवाला विक्रेत्यांची संख्या व त्यांची भविष्यातील वाढ लक्षात घेवुन त्यांच्या उपयोगी ठरतील व पुरेशी ठरतील अशा जागांचे आराखडे विनिर्दिष्ट सुत्रे अंगिकारुन तयार करणे.
**११)**समुचित सरकारने त्यास वेळोवेळी नेमुन दिलेले इतर कोणतेही कर्तव्य अथवा कर्तव्ये पार पाडणे.

## २.७ **फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती -**

प्रत्येक फेरीवाला क्षेत्रासाठी खालीलप्रमाणे फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात येईल :-

१) प्रत्येक फेरीवाला क्षेत्रामध्ये व्यवसाय करणा-या फेरीवाल्यांची संस्था स्थापन करण्यात येईल. सदर संस्थेची नोंदणी सहकार कायद्याखाली किंवा संस्था नोंदणी अधिनियमाखाली करण्यात येईल.
२) सबंधित फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणा-या प्रत्येक फेरीवाल्याने या संस्थेचे सभासद होणे बंधनकारक राहील.
३) सदर संस्थेचे सभासद त्यांचे सदस्यांपैकी एक कार्यकारी समिती किंवा फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती निवडतील,त्यापैकी शक्यतो एक महिला असावी. त्या समितीमध्ये अध्यक्ष,सचिव व खजिनदार असे पदाधिकारी असतील. त्यांचा कार्यकाळ ३ वर्षापर्यंत असु शकेल. एकदा निवडून आलेले पदाधिकारी लगतच्या पूढील कालावधी करीता निवडीस पात्र राहणार नाहीत.

## २.८ **फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व जबाबदा-या -**

फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व जबाबदा-यांमध्ये खालील बाबींचा समावेश असेल :-

१) फेरीवाला क्षेत्रा करीता प्रतिमाह आलेले पाणी /विद्युत देयकाची रक्कम सर्व सभासदांकडून समान पध्दतीने जमा करुन संबंधित सेवा प्राधिकरणाकडे भरणा करणे.
२) फेरीवाला क्षेत्राची साफसफाई,विद्युत व्यवस्था,पाणी पूरवठा व्यवस्था व सर्वसाधारण व्यवस्था पाहणे व फेरीवाला क्षेत्रातील सार्वजनिक जागेवरील अतिक्रमणे इत्यादीवर नियंत्रण ठेवणे.
३) फेरीवाला क्षेत्राचे बाहेर घोषित केलेल्या ना-फेरीवाला क्षेत्रात फेरीवाल्यांनी व्यवसाय करु नये व फक्त नोंदणीकृत फेरीवालेच फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करतील हे कटाक्षाने पाहणे.
४) फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती सदस्यांकडून संबंधित फेरीवाल्यांच्या संस्थेने ठरविल्याप्रमाणे सभासद वर्गणी फेरीवाल्यांच्या भागभांडवला करीता जमा करेल.

# भाग - ३
# फेरीवाल्यांची नोंदणी

## ३.१ फिरत्या फेरीवाल्यांकरीता नोंदणीची कार्यपध्दती व सर्वसाधारण अटी व शर्ती :-

फिरत्या फेरीवाल्यांची फेरीवाला नोंदणी खालील कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल :-

१) अमरावती महानगरपालिका फेरीवाला नोंदणीसाठी आव्हान करण्या करीता वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करील.
२) फेरीवाल्यांचे नोंदणी करीता महानगरपालिका क्षेत्रात अर्जदार विहीत नमुन्यात प्रभाग फेरीवाला समितीकडे अर्ज करील.
३) फेरीवाला नोंदणी करण्या करीता अर्जदाराने अर्जासोबत राहिवासाचा दाखला जोडणे आवश्यक राहील.
४) महानगरपालिकेने ठरविलेले नोंदणी शुल्क अर्जदार नोंदणीचे वेळेस भरेल. दारिद्य रेषेखालील यादीत नांव असलेल्या कुटुंबातील अर्जदार व्यक्तीने नोंदणी शुल्क भरणे आवश्यक राहणार नाही.
५) फेरीवाल्यांचे नोंदणीचा कालावधी कमाल ५ वर्षांचा राहील व त्यानंतर नोंदणीचे नुतनीकरण करणे आवश्यक राहील.
६) नोंदणीकृत फेरीवाल्यांना महानगरपालिका छायाचित्र असलेले ओळखपत्र देईल.

### फिरत्या फेरीवाल्यांच्या नोंदणीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती :-

१) प्रत्येक नोंदणीकृत फिरत्या फेरीवाल्याने ओळखपत्र सहज दिसेल अशा पध्दतीने अंगावर लावणे बंधनकारक राहील.
२) फिरत्या फेरीवाल्यांना ना-फेरीवाला क्षेत्र वगळून इतर क्षेत्रात सतत फिरुन व्यवसाय करणे बंधनकारक राहील.
३) फिरत्या फेरीवाल्यांना त्यांचा व्यवसाय महानगरपालिका विहीत करेल त्या वेळेतच करता येईल.
४) नोंदणीकृत फिरता फेरीवाल्याला कोणताही अन्नपदार्थ शिजविता वा तयार करता येणार नाही. फिरत्या फेरीवाल्याला नोंदणी पत्रात नमूद केलेल्या वस्तुंचीच विक्री करता येईल.
५) नोंदणीकृत फेरीवाल्याला डोक्यावर टोपली/पाटी ठेवून किंवा सायकलने किंवा महानगरपालिकेने ठरवुन दिलेल्या आकाराच्या व रचनेच्या हातगाडीतून किंवा अन्य वाहन इत्यादीमधून व्यवसाय करता येईल. मात्र त्या वाहनांवर फेरीवाला नोंदणी क्रमांक लिहीणे बंधनकारक राहील.
६) फिरता फेरीवाला कचरा रस्त्यामध्ये कोठेही न टाकता तो महानगरपालिकेच्या कचरा कुंडीत टाकेल.
७) नोंदणीकृत फिरता फेरीवाला ना-फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करतांना आढळल्यास त्याची नोंदणी रद्द करण्यात येईल व ते या उपविधीच्या तरतूदी प्रमाणे व संबंधित महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी प्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल.

## ३.२ स्थिर फेरीवाल्यांकरीता नोंदणीची कार्यपध्दती व सर्वसाधारण अटी व शर्ती :-

१) महानगरपालिका स्थिर फेरीवाला नोंदणीसाठी आव्हान करण्या करीता वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करेल.
२) महानगरपालिकेत स्थिर फेरीवाल्यांचे नोदंणी करीता अर्जदार विहीत नमुन्यात प्रभाग फेरीवाला समितीकडे अर्ज करेल.
३) स्थिर फेरीवाला नोंदणी करण्या करीता अर्जदाराने अर्जासोबत महाराष्ट्र राज्यात १५ वर्षे वास्तव्य करीत असल्या बाबत अधिवास प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील.

४) महानगरपालिकेने ठरविलेले नोंदणी शुल्क अर्जदार नोंदणीचे वेळेस भरेल. दारिद्रय रेषेखालील यादीत नांव असलेल्या कुटुंबातील अर्जदार व्यक्तीस नोंदणी शुल्क भरणे आवश्यक नाही. तथापि,इतर शुल्क भरावे लागेल.

५) स्थिर व्यवसाय करणा-या नोंदणीकृत फेरीवाल्यांना महानगरपालिका छायाचित्र असलेले ओळखपत्र देईल.

**स्थिर फेरीवाल्यांच्या नोंदणीच्या सर्वसाधारण शर्ती व अटी :-**

१) नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्याने ओळखपत्र सहज दिसेल अशा पध्दतीने अंगावर लावणे बंधनकारक राहील.

२) नोंदणीकृत स्थिर फेरीवाला व्यवसायाचे जागी हजर नसतंना व्यवसाय सांभाळण्यासाठी तो व त्याचे कुटंबातील आणखी एका व्यक्तीचे नांव अर्जात नमूद करु शकेल. त्या व्यक्तीने नोंदणीच्या कोणत्याही अटींचा केलेला भंग हा नोंदणीकृत फेरीवाल्यानेच केला आहे,असे समजण्यात येवून नोंदणीकृत फेरीवाला त्यासाठी कारवाईस पात्र राहील.

३) स्थिर फेरीवाल्यास देण्यात आलेली बैठकची जागा (पीच) ही महानगरपालिकेच्या मालकीची राहील. त्या जागेबाबत नोंदणीधारकाला कोणतही अधिकार प्राप्त होणार नाही. ही जागा कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करण्याचा नोंदणीधारकाला अधिकार असणार नाही. ेल्या जागेवरच विक्रीचा माल ठेवून पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपात ठराविक वेळेसाठी

४) स्थिर फेरीवाला,फेरीवाला क्षेत्रात,महानगरपालिकेने नेमून दिल दैनिक भाडेतत्वावर व्यवसाय करेल.

५) महानगरपालिकेने पदपथावर घोषित केलेले तात्पुरता फेरीवाला क्षेत्र यामध्ये महपालिकेने ठरवून दिलेल्या संरचनेच्या किऑस्क मध्ये विक्रीचा माल ठेवून स्थिर फेरीवाल्यास व्यवसाय करता येईल किंवा महापालिका जमिनीवर आखून दिलेल्या पीच वर घडीच्या टेबल वर विक्रीचा माल ठेवून व्यवसाय करता येईल. मात्र विक्रीची वेळ संपल्यानंतर घडीचा टेबल व माल परत घेवून जाणे बंधनकारक राहील.

६) विशेष सुरक्षा कारणासाठी २४ तासांची नोटीस देवून पीचच्या जागेचा वापर थांबविण्याचा आयुक्त यांना अधिकार असेल.

७) स्थिर फेरीवाल्यांना त्यांचा व्यवसाय महानगरपालिकेने विहीत केलेल्या वेळेतच करता येईल. तसेच गि-हाईकांशी सभ्य भाषेत व्यवहार करणे व चांगली वर्तणूक ठेवणे स्थिर फेरीवाल्यास बंधनकारक राहील.

८) स्थिर फेरीवाल्यास गि-हाईकांचे लक्ष वेधण्यासाठी मोठ्याने ओरडण्याचा,गि-हाईकाच्या अंगाला स्पर्श करण्याचा,ध्वनीवर्धकाचा,उघडझाप करणा-या व तिव्र प्रकाशाच्या दिव्यांचा वापर करण्याचा अधिकार असणार नाही.

९) स्थिर फेरीवाल्यास केवळ नोंदणीपत्रात नमूद केलेल्या वस्तुच विक्रीसाठी ठेवता येतील.

१०) ज्या अटींवर नोंदणी देण्यात आलेली आहे,त्यापैकी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास नोंदणी रद्द केली जाईल. मात्र नोंदणी रद्द करण्यापूर्वी नोटीस देवून नोंदणीधारकाला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल. ज्या नोंदणीधारकाची नोंदणी रद्द झालेली आहे,त्याची पुन्हा नोंदणी करण्यात येणार नाही.

११) स्थिर फेरीवाला मयत/विकलांग झाल्यास त्याची स्थिर फेरीवाला नोंदणीची विक्री करता येणार नाही. परंतु,त्याची नोंदणी त्यांच्या वारसकडे हस्तांतरीत करता येईल.

## भाग - ४

## फेरीवाला व्यवसाय क्षेत्राचे नियोजन

**४.१ फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र जाहिर करणे.**

**४.११ फेरीवाला क्षेत्र जाहिर करणे.**

४.१११ निकष -

फेरीवाला क्षेत्र जाहिर करण्याकरीता खालील निकष वापरावेत.

१) फेरीवाला क्षेत्र - I

I. सर्वसाधारणपणे परिच्छेद ४.२ मध्ये नमूद केल्यानुसार स्थिर फेरीवाला व्यवसायासाठी विशीष्ट पध्दतीने निर्माण करण्यात आलेल्या जागा फेरीवाला क्षेत्र - I म्हणून घोषित करण्यात येतील.

II. रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही तसेच वाहतुकीची कोंडी होणार नाही अशा परिच्छेद ४.१२ मध्ये समाविष्ट होणार नाहीत असे पदपथावर ही तात्पुरते फेरीवाला क्षेत्र - I घोषित करता येईल. मात्र,जसे-जसे परिच्छेद ४.२ अनुसार स्थिर फेरीवाल्यांच्या व्यवसायासाठी जागा निर्माण होतील तसे-तसे तात्पुरता फेरीवाला क्षेत्र - I टप्प्या-टप्प्याने संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

२) फेरीवाला क्षेत्र - II

रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही तसेच वाहतुकीची कोंडी होणार नाही व ना-फेरीवाला क्षेत्रा व्यतीरीक्त रस्त्यांवर फेरीवाला क्षेत्र - II जाहिर करता येईल. या रस्त्यांवर फिरता फेरिवाल्यांनी फिरुन व्यवसाय करण्यास मुभा राही -ल व कोणत्याही परिस्थीतीत त्यांना स्थिरस्वरुपात व्यवसाय करण्यास मज्जाव राहील.

**४.११२ कार्यपध्दती -**

**अ) महानगरपालिका क्षेत्रासाठी फेरीवाला क्षेत्र जाहिर करण्याची कार्यपध्दती :-**

महानगरपालिका क्षेत्रात “फेरीवाला क्षेत्र” जाहिर करण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यपध्दती असेल :-

**१)** प्रथम प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीमार्फत फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करता येईल.

**२)** प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती मार्फत स्थिर व फिरता फेरीवाल्यां कीता जागांचेही सर्वेक्षण करण्यात येईल.

**३)** सर्वेक्षणानुसार स्थिर व फिरता फेरीवाल्यांकरीता सुचविण्यात आलेल्या ठिकाणां बाबत प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती,सहाय्यक संचालक नगर रचना यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेण्या करीता प्रस्ताव पाठवेल.

**४)** सहय्यक संचालक,नगर रचना यांचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती प्रस्ताव,प्रभाग फेरीवाला समितीकडे सादर करील. प्रभाग फेरीवाला समिती फेरीवाला क्षेत्राची शिफारस करण्यापूर्वी दोन स्थानिक वृत्तपत्रात नोटीस देईल व ३० दिवसांत नागरीकांच्या हरकती व सुचना मागवेल.

**५)** नागरीकांच्या हरकती व सुचनांवर प्रभाग फेरीवाला समिती सुनावणी घेईल व प्रस्ताव शहर फेरीवाला समितीकडे शिफारसीसह पाठवेल.

**६)** शहर फेरीवाला समितीकडून स्थिर व फिरता फेरीवाल्यांकरीता सुचविण्यात आलेल्या ठिकाणांचा प्रस्ताव अ,ब,क वर्ग महानगरपालिका ठराव करुन अंतिम मंजुरी करीता शासनाकडे पाठवेल. आणि ड वर्ग महानगरपालिका अंतिम मंजुरी करीता संचालक,नगरपालिका प्रशासन यांचे कडे पाठवेल.

**७)** अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर आयुक्त स्थिर व फिरता फेरीवाल्यांची ठिकाणे दोन स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून प्रसिध्द करेल.

**८)** प्रत्येक घोषित केलेल्या फेरीवाला क्षेत्रात त्याच्या तपशिलासह “फेरीवाला क्षेत्र” असे नामफलक लावण्यात येतील.

**ब) महानगरपालिका क्षेत्रात स्थिर व फिरता फेरीवाल्यांच्या नोंदणीची संया निश्चीत करण्याची कार्यपध्दती :-**

१) शासनाच्या मान्यतेने फेरीवाला क्षेत्र म्हणून निश्चीत करण्यात आलेली ठिकाणे व परिच्छेद क्र.४.२ नुसार स्थिर फेरीवाला व्यवसायासाठी विशेष पध्दतीने निर्माण करण्यात आलेल्या किंवा निर्माण होवू शकणा-या जागा यांच्या आधारे प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती प्रभागासाठी स्थिर व फिरता फेरीवाल्यांची नोंदणीची कमाल संख्या प्रभाग फेरीवाला समितीमार्फत शहर फेरीवाला समितीला सुचविल.

२) शहर फेरीवाला समितीकडून स्थिर व फिरता फेरीवाल्यांची नोंदणी करण्याकामी सुचविण्यात आलेली नोंदणीची कमाल संख्या अ,ब,क वर्ग महानगरपालिका ठराव करुन अंतिम मंजुरी करीता शासनाकडे पाठवेल आणि ड वर्ग महानगरपालिका ठराव करुन अंतिम मंजुरी करीता संचालक,नगरपालिका प्रशासन यांचेकडे पाठवेल.

**४.१२ ना-फेरीवाला क्षेत्र जाहिर करणे :-**

**४.१२१ ना-फेरीवाला क्षेत्रासाठी निकष -**

ना-फेरीवाला क्षेत्र जाहिर करण्या करीता खालील निकष वापरण्यात येतील :-

**१)** २ मिटर पेक्षा कमी रुंदीचे पदपथ.
**२)** गर्दीच्या ठिकाणी,वाहतुकीची कोंडी होत असलेली ठिकाणे.
**३)** कोणताही वाहन वाहतुकीचा पुल.
**४)** गोपनियता व सुरक्षितता या कारणासाठी निश्चीत केलेले क्षेत्र.
**५)** दुकानाच्या समोरील पदपथ.
**६)** महानगरपालिकेच्या बाजारापासून १०० मिटर अंतरापर्यंतचे क्षेत्र.
७) धार्मिक स्थळे,रुग्णालये,शैक्षणिक संस्था,रेल्वे स्थानके यांचे हद्दीपासून सर्व बाजुने १०० मिटर अंतरापर्यंतचे रस्ते व पदपथ,परंतु धार्मिक स्थळाच्या शेजारी खालील व्यवसाय करणा-या स्थिर फेरीवाल्यां करीता जागा आरक्षित करता येईल.

I. हार-तुरे
II. नारळ,अगरबत्ती,मेणबत्ती विक्री.
III. पुजा साहित्य.

**४.१२२ ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याचे प्राधान्यक्रम :-**

ना-फेरीवाला क्षेत्र जाहिर करतांना खालील प्राधान्यक्रम पाळण्यात येईल.

१) गोपनियता व सुरक्षितता या कारणासाठी निश्चीत केलेली ठिकाणे.
**२)** संवेदनशिल ठिकाणे. उदा.धार्मिक स्थळे,रुग्णालये,शैक्षणिक संस्था,रेल्वे स्थानके इ.
**३)** गर्दीच्या ठिकाणी,वाहतुकीची कोंडी हेत असलेली ठिकाणे
**४)** दुकानासमोरील पदपथ.

**४.१२३ कार्यपध्दती :-**

**अ) महानगरपालिका क्षेत्रात ना फेरीवाला क्षेत्र जाहिर करण्याची कार्यपध्दत :-**

परिच्छेद ४.१२३ च्या प्राधान्यक्रमानुसार ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करण्या करीता खालील कार्यपध्दती अवलंबिण्यात येईल :-

I. प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती परिच्छेद क्र.२.११४ च्या निकषानुसार त्यांच्या कार्यक्षेत्रात ना-फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावयाच्या क्षेत्राविषयी सविस्तर अहवाल प्रभाग फेरीवाला समितीस सादर करेल. प्रभाग फेरीवाला समिती आपल्या शिफारशीसह महानगरपालिका शहर फेरीवाला समितीकडे प्रस्ताव सादर करेल.

II. प्रभाग फेरीवाला समिती ना-फेरीवाला क्षेत्राची शिफारस करण्यापूर्वी दोन स्थानिक वृत्तपत्रात नोटीस देईल व ३० दिवसांत नागरीकांच्या हरकती व सुचना मागवेल.
III. नागरीकांच्या हरकती व सुचनांवर प्रभाग फेरीवाला समिती सुनावणी घेईल व प्रस्ताव शहर फेरीवाला समितीकडे संमतीसाठी पाठवेल.
IV. शहर फेरीवाला समिती महानगरपालिकेच्या मंजुरीने ना-फेरीवाला क्षेत्र जाहिर करेल.
V. महानगरपालिकेच्या मंजुरी नंतर आयुक्त दोन स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून मंजुर ना-फेरीवाला क्षेत्राची यादी प्रसिध्द करेल.
VI. प्रत्येक घोषित केलेल्या ना-फेरीवाला क्षेत्रात त्याच्या तपशिलासह "ना-फेरीवाला क्षेत्र" असे नामफलक लावणे बंधनकारक राहील.

**४.१२४ टप्प्या-टप्प्याने ना-फेरीवाला क्षेत्राची अंमलबजावणी :-**

महानगरपालिका वरील कार्यपध्दती नुसार ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करतांना खालील प्रमाणे टप्प्या-टप्प्याने कार्यवाही करावयाची आहे :-

अ) प्रथम परिच्छेद ४.१२१ च्या निकषानुसार जे रस्ते ना-फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावे लागतील त्यांची यादी तयार करण्यात येईल व परिच्छेद ४.१२२ प्रमाणे अशा रस्त्यांचे प्राधान्यक्रम ठरविण्यात येतील.

ब) सदर रस्त्यांवर व्यवसाय करणा-या फेरीवाल्यांची यादी तयार करण्यात येईल व या फेरीवाल्यांच्या यादीमधून स्थिर फेरीवाल्यांकरीता परिच्छेद ५.१ अनुसार पात्र असणा-या स्थिर फेरीवाल्यांची यादी वेगळी करण्यात येईल.

क) या स्थिर फेरीवाल्यांच्या यादीतील पात्र स्थिर फेरीवाल्यांना परिच्छेद ४.२ अनुसार उपलब्ध होणा-या जागांमध्ये तसेच ज्या पदपथांना परिच्छेद ४.१२१ च्या निकषांची बाधा येत नाही अशा पदपथांवर "तात्पुरता फेरीवाला क्षेत्र-I" घोषित करुन परिच्छेद ५.१ मध्ये विहीत प्राधान्यक्रमानुसार स्थलांतरीत करण्यात येईल.

वरीलप्रमाणे उपलब्ध जागा परिच्छेद ४.१२४ (ब) प्रमाणे पात्र असणा-या स्थिर फेरीवाल्यांच्या संख्येच्या तुलनेत अपु-या असल्यास परिच्छेद ४.१२२ मध्ये कमी प्राधान्यक्रमाचे जे ना-फेरीवाला क्षेत्र आहेत.अशा क्षेत्रांना निव्वळ तात्पुरत्यास्वरुपामध्ये "तात्पुरता फेरीवाला क्षेत्र-I" असे घोषित करता येऊ शकेल.

ड) जे फेरीवाले परिच्छेद ५.१ मधिल स्थिर फेरीवाल्यांच्या प्राधान्यक्रमात बसत नाहीत अशा फेरीवाल्यांची फिरता फेरीवाला म्हणून नोंदणी करता येइल व असे केल्यानंतर सदरचा रस्ता ना-फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करता येईल.

इ) जे रस्ते परिच्छेद ४.१२२ मधिल प्राधान्यक्रमानुसार अग्रक्रमाने ना-फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावयाचे आहेत ते वरील प्रक्रियेनुसार प्रथम "ना-फेरीवाला क्षेत्र" म्हणून घोषित करण्यात येतील व त्या ठिकाणी व्यवसाय करणा-या परिच्छेद ५.१ प्रमाणे पात्र स्थिर फेरीवाल्यांचा परिच्छेद ४.२ प्रमाणे उपलब्ध होणा-या जागा देण्यासाठी प्रथम विचार करण्यात येईल. त्यानंतर टप्प्या-टप्प्याने परिच्छेद ४.२ प्रमाणे जागा उपलब्ध झाल्यावर उत्तरोत्तर ना-फेरीवाला क्षेत्र घोषित केले जाईल.

ई) परिच्छेद ४.२ अनुसार स्थिर फेरीवाल्यांसाठी टप्प्या-टप्प्याने अधिक जागा उपलब्ध होताच पदपथांवर तात्पुरता फेरीवाला क्षेत्रात बसविलेल्या स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्यात येईल.

फ) उपरोक्त प्रक्रियेची अंमलबजावणी करुन परिच्छेद ४.१२१ च्या निकषात येणारे रस्ते ना-फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येईल.

## ४.१३ फेरीवाल्यांचे विनियमनाकरीता कृती आराखडा :-

महानगरपालिका फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियम खालील प्रमाणे करण्यात येईल :-

**१)** सर्वेक्षणाच्या माध्यमातुन फेरीवाल्यांची गणना करण्यात येईल.
**२)** गणना केलेल्या फेरीवाल्यांची व्यवसाय निहाय परिच्छेद ४.१२१ मधिल क्र.३ प्रमाणे वर्गवारी केली जाईा.
**३)** प्रथम प्राधान्याने घोषित करण्यात येणारे ना-फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणा-या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांना त्वरीत परिच्छेद क्र.४.२ अनुसार उपलब्ध नागरी जागांमध्ये परिच्छेद ५.१ मधिल प्राधान्यक्रमानुसार स्थलांतरीत करण्यात येईल. यानंतर शिल्लक राहिलेल्या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांना परिच्छेद क्र.५.१ मधिल प्राधान्यक्रमानुसार तुर्तास घोषित केलेल्या "तात्पुरता फेरीवाला क्षेत्र-I" मध्ये स्थलांतरीत करण्यात येईल.
**४)** स्थिर फेरीवाल्यांकरीता अधिकाधिक जागा परिच्छेद ४.२ प्रमाणे तयार करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्न करील. टप्प्या-टप्प्याने उपलब्ध होणा-या अशा नागरी जागांमध्ये तात्पुरत्या फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणा-या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांना टप्प्या-टप्प्याने परिच्छेद ५.१ मधिल प्राधान्यक्रमानुसार स्थलांतरीत करण्यात येईल. रस्ते व पदपथ फेरीवाले मुक्त राहण्याचे उद्देशाने टप्प्या-टप्प्याने सर्व घोषित केलेले तात्पुरता फेरीवाला क्षेत्र-I यांचा बदल ना-फेरीवाला क्षेत्रात करण्याचे दृष्टीने सुक्ष्म नियोजन करुन त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येईल.

## ४.२ फेरीवाल्यांचे व्यवसायाकरीता नविन जागा निर्माण करणे.

### ४.२१ स्थिर फेरीवाल्यांकरीता जागेचे नियोजन :-

१) सर्वसाधारणपणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात,तात्पुरता फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले क्षेत्र वगळता रस्ता व पदपथावर स्थिर फेरीवाल्यांना व्यवसाय करणे अनुज्ञेय असणार नाही.
**२)** नविन विकास आराखडा तयार करतेवेळेस तसेच शहराच्या नविन भागाच्या विकासाच्या वेळेस नियोजनामध्ये फेरीवाल्यांच्या जागेचे नियोजन करण्यात येईल.
**३)** स्थिर फेरवाल्यांकरीत जागेचे नियोजन करते वेळेस शक्यतो फेरीवाल्यांचे तिन प्रकाराची वर्गवारी करण्यात येईल.

अ) तयार खाद्यपदार्थ किंवा खाद्यपदार्थ त्याच ठिकाणी तयार करुन विक्री करणारे फेरीवाले.
ब) भाजीपाला,फळे,दुध,अंडी इत्यादी विक्री करणारे फेरीवाले.
क) इतर फेरीवाले (उदा.रेडीमेड गारमेंट,कटलरी इत्यादी)

### अ) तयार खाद्यपदार्थ किंवा खाद्यपदार्थ त्याच ठिकाणी तयार करुन विक्री करणारे फेरीवाल्यां करीता जागेचे नियोजन :-

**१) फूड प्लाझा तयार करणे :-**

अ) महत्वाच्या ठिकाणी उदा.रेल्वे स्टेशन,बस स्थानके,शाळा,महाविद्यालये, सिनेमागृह इत्यादी जवळ "फूड प्लाझा" तयार करण्यात येईल. जे प्राधिकरणे किंवा खाजगी मालक याकरीता जागा उपलब्ध करुन देतील अशांना त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या जागेबद्दल हस्तांतरणीय विकास हक्क (T.D.R.) किंवा प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देता येईल.

ब) खाद्यपदार्थ त्याच ठिकाणी तयार करुन विक्री करणारे फेरीवाल्यांची जागा ही तयार खाद्यपदार्थ विक्री करणा-या फेरीवाल्यांचे जागेपेक्षा जास्त राहील.

क) फूड प्लाझा मध्ये सामायिक सोयी सुविधा करण्यात येतील. उदा. खाण्या साठीची जागा,हात धुण्याची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,कचराकुंडी इत्यादी.

(टीप :- याकरीता महानगरपालिकेने विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करुन घ्यावेत.)

**२) "रात्रकालीन फूड कोर्ट"**

ज्या रस्त्यांवर संध्याकाळ नतर रहदारीचे प्रमाण नाही अशा रस्त्यांची रात्रकालीन फूड कोर्टसाठी निवड करण्यात येईल. या रस्त्यांवर रात्री ८:०० नंतर महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या आकार/प्रकारच्या वाहनांमार्फत नोंदणीकृत फिरत्या फेरीवाल्यांना खाद्यपदार्थ विक्री करता येईल.

**३) "सप्ताहांत फूड कोर्ट" –**

सार्वजनिक सुटीच्य दिवशी तसेच सप्ताहाच्या अखेरचे दोन दिवसांकरीता (शनिवार,रविवार) शहरातील काही भागातील रस्ते व पदपथ सप्ताहांत फूड कोर्ट करिता राखीव ठेवण्यात येतील. या रस्त्यांवर रात्री ८:०० नंतर महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या आकार/प्रकाराच्या वाहनांमार्फत नोंदणीकृत फिरत्या फेरीवाल्यांना खाद्यपदार्थ विक्री करता येईल.

**ब) भाजीपाला,फळे,दूध,अंडी इत्यादी विक्री करणारे फेरीवाल्यांकरीता जागेचे नियोजन :-**

१. महानगरपालिका क्षेत्रात नविन पालिका बाजार बांधतांना किंवा जुन्या बाजारांचा पुर्नविकास करतेवेळेस नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांकरीता जागेचे नियोजन करण्यात येईल. याकरीता वाढीव एफ.एस.आय. उपलब्ध करुन एकूण चटई क्षेत्राच्या ५० टक्के जागेमध्ये फेरीवाल्यांचे नियोजन करण्यात येईल.

या नियाजनामध्ये इमारतीच्या सर्वात वरचा मजला फूड कोर्ट करीता राखीव ठेवण्यात येईल. इतर मजल्यांमध्ये ५० टक्के जागा ही दैनंदिन गरजेच्या वस्तु विक्री करणा-या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांकरीता राखीव ठेवून उर्वरीत जागा इतर व्यवसायीकांना/दुकानदारांना देण्यात येईल. जेणेकरुन नागरीक तेथे आकर्षित होतील.

(टीप :- याकरीता महानगरपालिकेने विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करुन घ्यावेत.)

२. महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या इमारतींचे पुर्नविकास,झोपडपट्टी पुर्नविकास आणि नागरी नुतनीकरण योजना (Urban Renewal Scheme) इत्यादी योजनांमध्ये नागरीकांच्या सोयीच्या दृष्टीने इमारतींमध्ये खालील दैनंदिन गरजेच्या वस्तुंच्या विक्री करीता राखीव गळे बांधणे अनुज्ञेय असेल.
   १) भाजीपाला व फळे
   २) दुध व अंडी
   ३) किराणा माल
   ४) इस्त्रीवाला किंवा औषधे

सदर गाळे नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांसाठी उपलब्ध करण्याची लेखी हमी दिल्यास या गाळ्यांकरीता आवश्यक असणारे बांधकाम क्षेत्र चटईक्षेत्र मुक्त अनुज्ञेय राहील.
(टीप :- याकरीता महानगरपालिकेने विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करुन घ्यावेत.)

३. खाजगी इमारतींना बांधकाम परवानगी देते वेळेस त्यातील राहिवाशांना सोयीच्या दृष्टीने खालील दैनंदिन गरजेच्या वस्तुंच्या विक्री करीता गाळे बांधणे अनुज्ञेय असेल. सदरचे गाळे खालील वस्तुंच्या विक्रीकरीता राखीव राहतील.

१) भाजीपाला व फळे
२) दुध व अंडी
३) किराणा माल
४) इस्त्रीवाला किंवा औषधे

सदर गाळे नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांसाठी उपलब्ध करण्याची लेखी हमी दिल्यास या गाळ्यांकरीता आवश्यक असणारे बांधकाम क्षेत्र चटईक्षेत्र मुक्त अनुज्ञेय राहील.

(टीप :- याकरीता महानगरपालिकेने विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करुन घ्यावेत.)

४. महानगरपालिका क्षेत्रातील मोठ्या क्षेत्राच्या अभिन्यासामध्ये सोडावयाच्या सुविधा क्षेत्रावर बांधकाम करतांना अनुज्ञेय चटई क्षेत्राच्या २० टक्के बांधकाम क्षेत्र दैनंदिन गरजेच्या वस्तु विक्री करणा-या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांकरीता राखीव ठेवण्यात येईल.

(टीप :- याकरीता महानगरपालिकेने विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करुन घ्यावेत.)

**५.** महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असणा-या गृहनिर्माण संस्थांच्या मोकळ्या जागेत नोंदणीकृत फेरीवाल्यांकरीता काही वेळ व्यवसाय करण्यासाठी गृहनिर्माण संस्थांच्या परवानगीने मुभा देता येईल.

**क) इतर फेरीवाले (उदा.रेडीमेड गारमेंट,कटलरी इ.) करीता जागेचे नियोजन करणे :-**

**१)** महानगरपालिका क्षेत्रातील रहदारीच्या रस्त्यांवर स्काय वॉक व सब-वे तयार करण्यात येतात. सदरचे स्काय वॉक व सब-वे च नियोजन करतांना कायदेशिर बाबी तपासुन व जागेची प्रत्यक्षात स्थिती विचारात घेवून फेरीवाल्यां करीता जागा निर्माण करण्याची शक्यता तपासण्यात येईल.

**२)** महानगरपालिकेच्या क्षेत्रात भुयारी वाहनतळाचे बांधकाम करतांना वाणिज्यिक वापरासाठी अनुज्ञेय असणा-या क्षेत्राच्या ५ टक्के इतकी जागा फेरीवाल्यांकरीता राखीव ठेवण्यात येईल. मात्र,अशा ठिकाणी प्रकाश,खेळती व शुध्द हवा मिळेल अशी वाहनतळाची रचना करणे क्रमप्राप्त राहील.

(टीप :- याकरीता महानगरपालिकेने विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करुन घ्यावेत.)

## ४.३ फेरीवाला क्षेत्रात पुरविण्यात येणा-या सोयी सुविधा :-

फेरीवाला क्षेत्र-I मध्ये फेरीवाला भुखंडात संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून खालील सोयी सुविधा पुरविण्यात येतील :-

१) नोंदणीकृत फेरीवाला विक्रेत्यांना विहीत पध्दतीने अनुज्ञप्ती प्रदान करणे,नविनीकरण करणे,निलंबीत करणे अथवा रद्द करणे.
२) विक्रय परिक्षेत्रामध्ये आणि फेरीवाला विक्रेत्यांसाठी शहर विक्रय समिती सोबत सल्ला मसलत करुन नागरी सेवा पुरविणे,ज्यात पुढील सेवांचा समावेश राहील.

I. घनकच-याची विल्हेवाट लावण्यासाठी तरतुदी करणे.
II. स्वच्छता राखण्यासाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणे.
III. विज पुरविणे.
IV. पिण्याच्या पाण्याची तरतुद करणे.

V. ऊन,पाऊस,धुळ व वारा इत्यादीपासुन संरक्षण होण्यासाठी सार्वजनिक आच्छादनांची व्यवस्था करणे.
VI. फेरीवाला भुखंडाच्या बाजुने संरक्षक भिंत उभारणे.
VII. फेरीवाला विक्रेत्यांचे व त्यांच्या मालाचे रक्षण करण्या करीता आश्रय पुरविणे.
VIII. साठवणुकीच्या सुविधा,सुशोभिकरण,निशाण्यांच्या जागा ठरविणे.
IX. फेरीवाला विक्रेत्यांना आवश्यक असलेल्या व योजनेत विनिर्दिष्ट केलेल्या इतर सुविधा.

महानगरपालिकेस उपरोक्त सोयी सुविधा पुरविण्याकरीता आलेला खर्च संबंधित फेरीवाल्यांकडून वसुल करता येईल.

३) शहर व्रिकय समिती सोबत सल्ला मसलत करुन बँकाचे मार्फत,स्थानिक प्राधि करणाचे व शहर विक्रय समितीचे काउंटर्स मार्फत नोंदणी शुल्क,फिरत्या स्टॉल्सनी वाहनतळाच्या उपयोगाचे व नागरी सेवांचा लाभ घेण्याचे शुल्क वसुलीची पध्दत ठरविणे.
४) विक्रय परिक्षेत्रांच्या धारण क्षमतेमध्ये फेरीवाला विक्रेत्यांचा समावेश करुन घेण्याचे उद्देशाने शहर विक्रय समिती सोबत सल्ला मसलत करुन,अस्तित्वात असलेल्या फेरीवाला विक्रेत्यांच्या संख्येची डिजीटल फोटो जनगणना व सर्वेक्षण विहीत पध्दतीने व विहीत तज्ञांच्या मदतीने अंगिकारणे.

## भाग-५

## स्थिर फेरीवाल्यांच्या व्यवसायाकरीता जागा वाटप करणे.

### ५.१ स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्याकरीता प्राधान्यक्रम :-

**१)** प्रथम घोषित करण्यात येणारे ना-फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणारे फेरीवाले.
२) महानगरपालिका विकास योजनेअंतर्गत ताब्यात घेतलेल्या किंवा घ्यावयाच्या जागांवर व्यवसाय करणारे पात्र स्थिर फेरीवाले.
३) तात्पुरत्या स्वरुपात फेरीवाला क्षेत्र-I म्हणून घोषित केलेल्या क्षेत्रामध्ये व्यवसाय करणारे स्थिर फेरीवाले.

उपरोक्त प्रमाणे प्रत्येक स्थलांतरणाच्या प्रसंगी स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्या करीता खालीलप्रमाणे क्रमवारी ठेवण्यात येईल :-

अ) प्रथम महाराष्ट्र राज्यात १५ वर्षांच्या वास्तव्याचा पुरावा असलेल्या पूर्वीपासुनच्या परवानाधारक फेरीवाल्यांचा त्यांच्या परवान्याच्या दिनांकानुसार प्राधान्यक्रम ठरविण्यात येईल. यानंतर जागा शिल्लक असल्यास,
ब) महाराष्ट्र राज्यात १५ वर्षांचे वास्तव्य असलेले इतर फेरीवाले यांचा विचार करण्यात येईल.

### ५.२ जागा वाटपासाठी समांतर आरक्षण

उपरोक्त प्राधान्यक्रमानुसार स्थिर फेरीवाल्यांना जागा वाटप करतेवेळी खालील प्रमाणे समांतर आरक्षण राहील.

अ) अपंग व्यक्ती :- ३%
ब) मागासवर्गिय :- २०%
क) दारिद्य रेषेखालील व्यक्ती :- १०%

या प्रत्येक प्रवर्गामध्ये ३०% महिला आरक्षण ठेवण्यात येईल व त्यात निराधार विधवा महिलांना प्राधान्य देण्यात येईल.

### ५.३ परवानाधारक स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्याची कार्यपध्दती.

**१)** महाराष्ट्र राज्यात १५ वर्षांचे वास्तव्य असलेल्या परवानाधारक स्थिर फेरीवाल्यांची त्यांच्या परवान्याच्या दिनांकाच्या आधारे जेष्ठता सुची तयार करण्यात येईल व जेष्ठतेनुसार जागा वाटपाकरिता त्यांचा विचार करण्यात येईल.

**२)** शहर फेरीवाला समिती यांनी सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने फेरीवाला क्षेत्र व ना-फेरीवाला क्षेत्र घोषित केल्या नंतर फेरीवाला क्षेत्रामध्ये व्यवसाय करणा-या पूर्वीपासुनच्या परवानाधारक फेरीवाल्यांना जागांचे वाटप करतांना शक्यतो त्याच ठिकाणी किंवा त्याच प्रभागात जाग देण्यात येईल.

**३)** जे ना-फेरीवाला क्षेत्रात परवानाधारक फेरीवाले व्यवसाय करित आहेत त्यांचे स्थलांतर शक्यतो त्याच प्रभागातील फेरीवाला क्षेत्रामध्ये करण्यात येईल. फेरीवाल्यांची संख्या जागेच्या संख्येपैकी जास्त असल्यास जागेचे वाटप सोडत पध्दतीने करण्यात येईल.

### ५.४ सोडत पध्दतीने जागा वाटप करणे.

**१.** ज्या फेरीवाला क्षेत्रामध्ये जागेच्या संख्येपेक्षा अर्जांचीसंख्या जास्त असल्यास सोडत पध्दतीने अर्जदाराशी नांवे निश्चीत करण्यात येतील.

**२.** एखाद्या अर्जदारास मिळालेली जागा नको असल्यास पुन्हा नव्याने सोडत काढण्याची वेळ येवू नये यासाठी जागेच्या संख्येपेक्षा ५ टक्के अधिक अर्जदारांची नांवे सोडतीत निश्चीत करुन ती नांवे प्रतिक्षा यादीवर ठेवली जातील.

**३.** सदरची सोडत पंचमंडळामार्फत करण्यात येईल.

**४.** प्रत्यक्ष सोडत सुरु करण्यापूर्वी उपस्थितांसमोर व पंचमंडळामार्फत सोडतीचे प्रात्यक्षिक दाखविले जाईल.

**५.** सोडतीचा निकाल,फलकावर तात्काळ प्रदर्शित केला जाईल. प्रतिक्षा यादीचा निकालही प्रदर्शित केल्या जाईल.

**६.** पंचमंडळ प्रात्यक्षिकापासुन ते निकाल प्रदर्शित करण्यापर्यंतच्या सर्व बाबींची तपशिलवार नोंद करुन त्या अभिलेखावर स्वाक्षरी करतील.

**७.** पंचमंडळाने अंतिम केलेला निकाल प्रभाग/विभाग कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द केला जाईल.

**८.** पंचमंडळाचा अध्यक्ष याबाबतची माहिती लेखी स्वरुपात प्रभाग फेरीवाला समितीस कळवेल.

## <u>भाग - ६</u>

### १४. सामाजिक सुरक्षितता

**अ) भागभभांडवला करीता मदत.**

फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती त्यांच्या सभासदांची वर्गणी एकत्र करुन बँकेत जमा करील व त्यातून विविध नागरी सोयींच्या देयकांची रक्कम संबंधित प्राधिकरणाकडे जमा करील. फेरीवाल्यांच्या गरजेनुसार फेरीवाल्यांना भागभांडवलाकरीता जिल्ह्याच्या लिड बँकेच्या सहाय्याने कर्ज उपलब्ध करुन देण्यास महानगरपालिका मदत करील.

**ब) विमा संरक्षण.**

**१)** फेरीवाल्यांकरीता अपघाती विम्याचे संरक्षण असावे.

**२)** फेरीवाल्यांकरीता आरोग्य विम्याचे संरक्षण असावे.

३) फेरीवाल्यांकरीता मालाचे व विक्री वाहन संरक्षणार्थ विमा असावा.

४)

वरीलप्रमाणे विमा संरक्षणा करीता फेरीवाल्यांची नोंदणी करतांना नोंदणी शुल्कामध्येच महानगरपालिके कडून विम्याची रक्कम भरणा करुन घेण्यात येईल. किंवा फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती मार्फत स्वतंत्रपणे विम्याची रक्कम जमा करुन घेवून सर्व फेरीवाल्यांचे एकत्रित विमा काढण्यात येईल.

**क) आरोग्य तपासणी.**

महानगरपालिकेचा नागरी आरोग्य केंद्रामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील फेरीवाल्यांची वैद्यकीय तपासणी किमान वर्षातुन एकदा करण्यात येईल. तथापि,शहर फेरीवाला समितीला आवश्यक्तेनुसार फेरीवाल्यांची वैद्यकीय तपासणीचा कालावधी कमी करता येईल.

**ड) प्रशिक्षण व कौशल्यात वाढ.**

फेरीवाले हे अतिशय लहान उद्योजक असल्याने त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्याचप्रमाणे उत्पन्नाचे पर्यायी मार्ग शोधण्यासाठी त्यांचे तांत्रिक व व्यावसायीक कौशल्य वाढविण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

**१५. महसुल गोळा करणे.**

१) प्रभाग फेरीवाला समिती खालीलप्रमाणे शुल्क आकारेल :-

अ) नोंदणी शुल्क (फि)

ब) मासिक परिक्षण आकार हे व्यवसायाचे स्थान/प्रकार यानुसार वेगवेगळे असतील.

क) दंड

२) सदर गोळा केलेला महसुल हा महानगरपालिका निधीत जमा होईल. या निधीचा वेगळा लेखा ठेवण्यात येईल. या निधीच्या अनुषंगाने फेरीवाला समित्यांच्या कामकाजाचे अर्थसंकल्प तयार करण्यात येईल.

**भाग - ७**

**१६. सनियंत्रण :-**

**१)** सदर उपविधीची अंमलबजावणी यशस्विरीत्या होण्याकरीता महानगरपालिका शहरातील ना-फेरीवाला क्षेत्रातील रस्त्यांची विभागणी बिट निहाय करेल.

**२)** प्रत्येक बिटवर पर्यवेक्षण ठेवण्यासाठी महानगरपालिका पर्यवेक्षक कर्मचा-यांची नेमणुक करेल.

**३)** नोंदणी न करणा-या फेरीवाल्यांविरुध्द संबंधित महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे दखलपात्र गुन्हा नोंदविण्यात येईल.

**४)** ना-फेरीवाला क्षेत्रातुन महानगरपालिकेने जप्त केलेले सामान परत मिळणार नाही व अशा सामानाचा लिलाव महानगरपालिके कडून करण्यात येईल.

**१७. शास्ती :-**

**या उपविधीच्या भंग करण्याबद्दल अपराध्यास -**

१) नोंदणी न करता व्यवसाय करणा-या फेरीवाल्यास,अपराध सिध्दीनंतर सहा महिने पर्यंत साध्या कैदेची आणि रुपये पाच हजार पर्यंत इतक्या दंडाची शिक्षा होईल.

२) ना-फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणा-या फेरीवाल्यास,अपराध सिध्दीनंतर सहा महिने पर्यंत साध्या कैदेची अणि रुपये पाच हजार पर्यंत इतक्या दंडाची शिक्षा होईल.

३) वरील (अ) व (ब) व्यतीरीक्त या उपविधीतील अन्य तरतुदींचा कोणत्याही प्रकारे भंग करण्या बद्द्दल अपराध्यास पाचशे रुपया पर्यंत अस शकेल अशा दंडाची शिक्षा होईल,आणि भंग करणे चालु राहिल्याचे बाबतीत,पहिल्यांदा भंग केल्याबद्दल दंड झाल्यानंतर ज्या दिवशी पर्यंत भंग करणे चालु राहील अशा प्रत्येक दिवसासाठी विस रुपये पर्यंत असु शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल. वरीलप्रमाणे दंड करण्यापूर्वी महानगरपालिकेच्या आयुक्तांकडुन किंवा त्याबाबत रितसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याकडुन संबंधित फेरीवाल्यास लेखी नोटीस देण्यात येईल व त्यांचे म्हणणे नोटीसीत विहीत करण्यात आलेल्या कालावधीत प्राप्त झाल्यास त्याचा विचार करुन दंडाविषयी योग्य तो निर्णय घेण्यात येईल. असा दंड करण्याशिवाय आणखी,आपल्या अधिकाराच्या कक्षेत असेल तेथवर,अपकृती सुधारण्यास दोषी फेरीवाल्यास भाग पाडता येईल.

४) या अधिनियमा अंतर्गत नोंदणी केलेल्या कोणत्याही फेरीवाला विक्रेत्याने अथवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा नोकराने यातील अथवा या अधिनियमा अंतर्गत फेरीवाला विक्रयाचे नियमन करण्या करीता विनिर्दिष्ट अटी व शर्तीचा अथवा या अधिनियमा अंतर्गत बनविण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचा अथवा योजनांचा भंग केल्यास अथवा फेरीवाला विक्रेत्याने

अशी नोंदणी अपवेदन अथवा कपट करुन मिळविली असल्याचे शहर विक्रय समितीचे समाधान झाल्यास फेरीवाला विक्रेत्याला या अधिनियमा अंतर्गत अन्य कोणताही दंड आकारण्यात आला असला तरी त्यास बाधा न येता शहर विक्रय समिती,नोंदणी रद्द अथवा तिला योग्य वाटेल त्या कालावधी करीता निलंबीत करु शकते.

५) या अधिनियमा अंतर्गत गाळ्याचे आवंटन झालेल्या अथवा अनुज्ञप्ती प्रदान केलेल्या कोणत्याही फेरीवाला विक्रेत्याने अथवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा नोकराने यातील अथवा या अधिनियमा अंतर्गत फेरीवाला विक्रयाचे नियमन करण्या करीता विनिर्दिष्ट अटी व शर्तीचा अथवा या अंतर्गत बनविण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचा अथवा योजनांचा भंग केल्यास अथवा फेरीवाला विक्रेत्याने असा गाळा अथवा अनुज्ञप्ती अपवेदन अथवा कपट करुन मिळविली असल्याचे शहर विक्रय समितीचे समाधान झाल्यास,फेरीवाला विक्रत्याला या अधिनियमा अंतर्गत अन्य कोणताही दंड आकारण्यात आला असला तरी त्यास बाधा न येता शहर विक्रय समिती,गाळ्याचे आवंटन अथवा अनुज्ञप्तीचे प्रदान रद्द करु शकते अथवा तिला योग्य वाटेल त्या कालावधी साठी निलंबीत करु शकते.

१८.**निर्वाचनाच्या शक्ती :-**

या उपविधीच्या कोणत्याही तरतुदींचा अर्थ लावण्यासंबधी विवाद उत्पन्न झाल्यास अशा ठिकाणी महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

**आयुक्त**
**अमरावती महानगरपालिका,अमरावती.**